# अणुऊर्जेबाबत लोकजागृतीची गरज- डॉ. काकोडकर

## आघारकर संस्थेतील व्याख्यानाला शिवसेनेचा विरोध


ठेवींवर सर्वाधिक व्याजदर
12.5%*
सर्वत्र १७ शाखा ६४० कोटींच्यावर ठेवी
लोकमान्य
लोकमान्य मल्टीपर्पज को-ऑप. सोसायटी लि.
संस्थापक अध्यक्ष किरण ठाकुर संपादक दै. तरुण भारत, बेळगाव
क्षेत्रीय कार्यालय: नवी पेठ, निवारा वृद्धाश्रमासमोर, पुणे
फोन:०२०-२४५३९२८७/८८
२४ शाखांसह पुणे येथे कार्यरत
www.lokmanyasociety.org


प्रतिनिधी

'चेर्नोबेल आणि फुकुशिमा या घटनांनंतर अणुऊर्जेबाबत जनमानसात गैरसमज निर्माण झाले असून याबाबत लोकजागृती करण्याची गरज आहे. अणुऊर्जा तीन टप्प्यांत तयार करण्यात येत असून, याबाबत भारतातील तंत्रज्ञान विकसित आहे,' असे मत अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांनी सोमवारी व्यक्त केले.

आघारकर संशोधन संस्थेतर्फे विज्ञानदिनानिमित्त सोमवारी आयोजित करण्यात आलेल्या ऊर्जा या विषयावरील व्याख्यानात डॉ. काकोडकर बोलत होते. काकोडकर म्हणाले, 'भारतात ऊर्जेचा वापर अतिशय कमी असून तो सरासरी इतका करण्यासाठी देशाची ऊर्जा निर्मिती ४० टक्क्यांनी वाढवणे गरजेचे आहे. ऊर्जेच्या वापरावर मानवी विकास निर्देशांक ठरत असून त्यात सध्या भारत पिछाडीवर आहे.

सध्याच्या ऊर्जा स्रोतांचा विचार करता कोळसा, पाणी हे पर्याय जास्त काळ टिकणारे नसल्याने भविष्यात अणुऊर्जेचा वापर महत्त्वाचा ठरणार आहे. सौर ऊर्जेच्या क्षेत्रातही मोठी संधी असून राजस्थान, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, गुजरात या राज्यांमध्ये मोठे प्रकल्प उभार[illegible]णे शक्य आहे. मात्र तंत्रज्ञानाचा वापर करून अनुदानाव्यतिरिक्त सौर ऊर्जेचा वापर वाढवणे शक्य आहे. देशाची गरज लक्षात घेता दोन्ही पर्यायांचा विचार करणे आवश्यक आहे.' यावेळी आघारकर संशोधन संस्थेचे संचालक डॉ. दिलीप रानडे आणि डॉ. कल्याणी बॅनर्जी उपस्थित होते.

आघारकर संशोधन संस्थेत डॉ. काकोडकर जैतापूर प्रकल्पाबाबत बोलणार आहेत, असे वाटल्याने सकाळी साधारण ५० शिवसैनिक व्याख्यानापूर्वी आघारकर संशोधन संस्थेत जमा झाले होते. गोंधळ होण्याची शक्यता लक्षात घेऊन संस्थेचे संचालक डॉ. दिलीप रानडे यांनी शिवसैनिकांशी चर्चा करून व्याख्यानात जैतापूरचा उल्लेख होणार नसल्याचे लेखी पत्र शिवसैनिकांना दिले. 'काकोडकरांना वैयक्तिक विरोध नाही, तर जैतापूरच्या समर्थनासाठी राज्य शासन त्यांचा वापर करत असून, त्याला शिवसेनेचा कायम विरोध राहील,' असे शिवसेनेच्या प्रवक्त्या नीलम गोऱ्हे यांनी सांगितले.

याबाबत डॉ. काकोडकर यांना पत्रकारांनी विचारले असता त्यांनी या विषयावर बोलण्यास नकार दिला, मात्र रत्नागिरी येथे होणारे आपले व्याख्यान रद्द करण्यात आले असून, रत्नागिरीला जाणार नसल्याचे सांगितले.


**Loksatta, Pune, February 28, 2012. Pp.9**